सं.फौ.ख.क्र.३८१६/२०२५

निशाणी क्र.१

## प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, वडगांव मावळ न्यायालय, ता.मावळ, जि.पुणे.

### आरोपीचा तपशिल

| | | | |
|---|---|---|---|
| १. | अपराधाची तारीख | ... | १४/०२/२०२४ |
| २. | फिर्याद दाखल तारीख | ... | १४/०२/२०२४ |
| ३. | फिर्यादीचे नाव | ... | **महाराष्ट्र शासनतर्फे,**<br>देहुरोड पोलीस स्टेशन, जि.पुणे. |
| ४. | आरोपीचे नाव | ६. | **समीर सिलू मकानदार**<br>वय – ३५ वर्षे, धंदा – चालक,<br>रा.– दत्त मंदिराजवळ शेळकेवस्ती, रावेत, ता.मावळ, जि.पुणे. |

**गुन्ह्याचा तपशिल** :– तुम्ही व इतर आरोपी दि.१४/०२/२०२४ रोजी दुपारी ०३.०० वाजण्याच्या सुमारास मौजे मुकाई चौक, किवळे गावचे हद्दीत, ता.मावळ, जि.पुणे येथे तुमच्या व इतर आरोपींच्या कब्जामध्ये रोख रक्कम रुपये १०,३००/– रुपये व जुगाराचे साहीत्य व एक मोबाईल असा एकुण किंमत रुपये ११,३००/– मटका नावाचा जुगार खेळत असतांना मिळून आला. त्यामुळे तुमच्याविरुद्ध मुंबई जुगार प्रतिबंध कायद्याचे कलम १२(अ) अंतर्गत गुन्हा नोंदविण्यात आला.

दि:०३/०१/२०२६

**(श्रीमती किर्ती अ. देशपांडे)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी
वडगांव मावळ, पुणे.

## आरोपीचे प्रतिकथन

प्रश्न १ : तुम्हाला केस पेपर्सच्या नकला मिळाल्या काय?

उत्तर : होय.

प्रश्न २ : तुम्हाला तुमच्यावर ठेवलेला आरोप समजला काय?

उत्तर : होय.

प्रश्न ३ : तुम्हाला सरकारी खर्चाने वकील पाहिजे काय?

उत्तर : नाही.

प्रश्न ४ :तुम्हाला गुन्हा कबुल आहे काय?

उत्तर : होय.

प्रश्न ५ : तुम्हाला आता मी गुन्हा कबुल केल्यास होणाऱ्या परिणामाचे आणि शिक्षेची माहिती सांगितली, ती तुम्हाला समजली काय?

उत्तर : होय.

प्रश्न ६ : तुम्हाला तरीही गुन्हा कबुल आहे काय?

उत्तर : होय.

द. ________

**आरोपीची सही**

दि:०३/०१/२०२६ **(श्रीमती किर्ती अ. देशपांडे)**

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी

वडगांव मावळ, पुणे.

## न्यायनिर्णय

१. आरोपीने स्वेच्छेने कोर्टासमोर येवुन त्याचा गुन्हा कबुल केलेला आहे. त्याबाबतचा अर्ज **नि.३** वर आहे.

२. आरोपीने गुन्हा कबूल केल्यास होणाऱ्या परिणामांची तसेच शिक्षेची माहिती

दिली, हे सर्व समजून त्यांनी गुन्हा कबूल केला.

३. सरकारी वकील व आरोपींचे वकील यांचे म्हणणे ऐकले.

४. सदर गुन्ह्यात प्रकरणाचे स्वरुप बघता, आरोपींची परिस्थिती बघता व अशी चुक पुन्हा होणार नाही या आश्वासनावरुन, मी आरोपींना नियोजित शिक्षेपेक्षा कमी शिक्षा देण्याच्या मताची आहे. करिता, खालीलप्रमाणे आदेश पारित करण्यात येत आहे.

## आदेश

१. आरोपी क्र.६ **समीर सिलू मकानदार** याला फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५२ अंतर्गत मुंबई जुगार कायदा कलम १२(अ) अन्वये दोषी धरण्यात येत आहे. आरोपीला रु.४००/– इतका दंड व कोर्ट उठेपर्यंत शिक्षा ठोठाविण्यात येते आहे. तसेच, दंड न भरल्यास आरोपीला एक दिवसाच्या साध्या कारावसाची शिक्षा ठोठाविण्यात येईल.

२. सदरचे प्रकरण हे इतर आरोपी यांच्याविरुध्द पुढे चालवण्यात यईल.

**(न्यायनिर्णय खुल्या न्यायदान कक्षात घोषित करुन संगणकमुद्रीत करण्यात आला.)**

दि:०३/०१/२०२६

**(श्रीमती किर्ती अ. देशपांडे)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी
वडगांव मावळ, पुणे.

सी/जी/दंड पेनॉल्टी
पावती क्रमांक -904.
अन्वये जमा असे 400/-

सहाय्यक अधिक्षक
दिवाणी व फौजदारी न्यायालय
वडगांव मावळ, पुणे.

0 3 JAN 2026